**सं.फौ. ख. क्र. ३३६/२०१७**
**सविता वि. मदन**
**निशाणी क्रमांक — ३७ वर पुढे**

**आरोपी तर्फे साक्षदार क्र.२ रामकली मदन हिवारे हिचा पुढील सरतपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्री एन.पी.बागडे यांच्यातर्फे**

**५.** मी माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यातील मजकूर मला वकीलांनी वाचून दाखविला त्यानंतर मी त्यावर सही केली आहे. त्यातील मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. सदर शपथपत्र नि.३७ वर दाखल केलेले आहे.

**६.** मी सदर प्रकरणात यादी निशानी क्र.५१ सोबत दि.दा.क्र.२६/२०१७ अरुण चव्हाण वि. रामकली हिवरे या दाव्याची निशानी क्र.१ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (सदर दस्तास निशानी देण्यास तक्रारदाराच्या वकीलांकडून हरकत आली की सदर दाव्याची प्रत ही खाजगी दस्त असून त्यास निशानी देता येत नाही. त्यास आर्टीकल देण्यात यावे. यावर आरोपीच्या वकीलांकडुन अशी हरकत घेण्यात आली की, सदर दस्त हा कोर्टातील दस्त असून त्याची प्रमाणीत प्रत न्यायालयात दाखल करण्यात आली असल्याने त्यास निशानी देण्यात यावे. – दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकुण तसेच दस्ताची पाहणी केली असता सदर दस्त दाव्याचे प्रमाणीत प्रत आहे करीता त्यास हरकतीसह निशानी देणे योग्य होईल.) सदर दस्तास हरकतीसह पुढील **निशानी क्र.५३** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.
मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास तहकुब

श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/–
**(श्रीमती. डी. एस. सैंदाणे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट न.२, रामटेक

रामटेक
दिनांक –२०/०६/२०२४.